## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६ ची जबानी

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की**

| | |
|---|---|
| माझे नांव | – नारायण हिरालाल भिल, |
| माझे वय | – ५० वर्षे, |
| व्यवसाय | – पो.हे.कॉ/ब.नं. १०८८, |
| राहणार | – शहर पोलीस स्टेशन, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार |

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.आर. डी. बिऱ्हाडे यांचे मार्फत.**

१. दि. १२/०८/२०२४ ला माझी नेमणुक उपनगर पोलीस ठाणे येथे पोलीस हवालदार या पदावर होतो. त्यादिवशी मला गुन्हा क्र.२८१/२०२४ भा.न्या.सं कलम ११८ (१) वगैरे अन्वये गुन्हा दाखल झाला होता. त्या गुन्हयाचा तपास माझ्याकडे देण्यात आला होता. तपासाकामी मला फिर्याद व एफ.आय.आर मिळाली होती. दि. १२/०८/२०२४ रोजी मी उमर्दा फाटा येथे घटनास्थळावर जावुन दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला होता. सदर घटनास्थळ फिर्यादीने दाखविले होते. सदर घटनास्थळ हे चौफुली असुन तेथे नंदुरबार ते धानोरा जाणारा रस्ता आहे. त्याठिकाणी पुर्वेला नंदुरबारकडे जाणारा रस्ता, पश्चिमेला धानोरा रोड, दक्षिणेला उमर्दा गावाकडे जाणारा रस्ता व उत्तरेकडे वेळावद व गुजरभवाली गावाकडे जाणारा रस्ता आहे. आता मला दाखविलेला निशाणी २१ कडील पंचनामा तोच असून त्यावर माझी व दोन पंचाची सही आहे. त्यातील मजकूर खरा बरोबर आहे.

२. त्यानंतर आरोपींचा शोध घेवुन त्यांना उपनगर पोलीस ठाण्यात बोलविण्यात आले. आरोपी क्र. १ ने गुन्हयात वापरलेली काठी पोलीस ठाण्यात हजर केली. ती मी दोन पंचांसमक्ष पंचनामा करुन जप्त केली. आता मला दाखविलेला निशाणी २२ कडील जप्ती पंचनामा तोच असून त्यावर माझी व दोन पंचाची सही आहे. त्यातील मजकूर खरा बरोबर आहे. त्यानंतर आरोपींना कलम ३५ (३) अन्वये नोटीस देवुन सोडण्यात आले. त्यानंतर मी मद्देमाल पावती तयार करण्यात आली. आता मला दाखविलेली मुद्देमाल पावती तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (मुद्देमाल पावतीस **निशाणी ३०** देण्यात येते.) त्यानंतर मी साक्षीदारांकडे त्यांची चौकशी करुन त्यांचे जबाब नोंदविले.

३. त्यानंतर मी दुखापती संबंधी प्रमाणपत्र मिळण्याकामी वैद्यकीय अधिकारी यांना पत्र दिले. आता मला दाखविलेले पत्र तेच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील

मजकुर बरोबर आहे. (सदर पत्राच्या स्थळप्रतीस **निशाणी ३१** देण्यात येते.) सदर पत्रान्वये जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. त्यामध्ये जखमींना गंभीर दुखापत झाल्याचे दिसुन आले. त्याप्रमाणे मी स्टेशन डायरीला नोंद घेवुन कलम वाढविण्याबाबत पत्र दिले. आता मला दाखविलेले पत्र तेच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर पत्राच्या स्थळप्रतीस **निशाणी ३२** देण्यात येते.) आरोपींनी फिर्यादीला काठीने डाव्या हातावर मारुन गंभीर दुखापत केल्याचे निष्पन्न झाल्याने मी आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले होते. जप्त काठी पाहिल्यास मी ओळखु शकतो. आता मला दाखविलेली वस्तुचिन्ह अ कडील काठी तिच आहे. आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री.के. एच. सावळे यांचे मार्फत.**

४. हे म्हणणे खरे नाही की, उमर्दा फाटा येथे नेहमी नंदुरबार कडे येणारे लोक उभे असतात. हे म्हणणे खरे आहे की, उमर्दा फाट्याला लागुन लोकांची शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटना पावसाळ्याच्या दिवसात घडलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, नंदुरबार ते धानोरा रस्त्याचे त्याकाळात काम चालु होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व फिर्यादी यांच्या दरम्यान पुर्वीपासुन वाद चालु होते. असे घडले नव्हते की, फिर्यादी दुचाकीवरुन पडल्यामुळे त्याला मार लागला होता.

**प्रश्न –** घटनेच्या दिवशी अथवा त्याच्या दुसऱ्यादिवशी फिर्यादीने त्याला मार लागल्याबाबत फिर्याद दिली होती का ?
**उत्तर –** तो पोलीस ठाण्यात आला होता. त्याला उपचाराकामी पाठविण्यात आले होते.

५. फिर्यादी रुग्णालयात साधारण ६ दिवस ॲडमिट होता. हे म्हणणे खरे आहे की, रुग्णालयात दाखल असतांना पोलीस रुग्णालयात जावुन जबाब नोंदवित असतात. उपनगर पोलीस ठाण्याचे पोलीसांनी रुग्णालयात जावुन फिर्यादीचा जबाब घेतला नव्हता. हात मोडल्यामुळे फिर्यादीच्या हाताला प्लास्टर लावले होते. ६ दिवसांनंतर फिर्यादी लगेच पोलीस ठाण्यात आला होता.

६. घटनास्थळ पंचनाम्याचे पंच मी बोलाविले होते. मी पंच म्हणुन रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पंच अजबसिंग हा फिर्यादीचा नातेवाईक आहे. अजबसिंगची बहीण ही फिर्यादीची पत्नी आहे किंवा कसे

याबाबत त्यांनी मला कळविलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनामा पोलीस ठाण्यात बसुन तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ने पोलीस ठाण्यात काठी आणुन दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती काठी मी जप्त केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वस्तुचिन्ह अ कडील काठी फिर्यादीने गावातुन आणुन दिली व त्याच्या नातेवाईकांमार्फत मी त्या काठीच्या जप्तीचा पंचनामा पोलीस ठाण्यात बसुन तयार केला.

७. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी ज्या दुचाकीने जात होता त्याचे कागदपत्र मी जप्त केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबतचा स्वतंत्र खुलासा दोषारोपपत्रासोबत जोडलेला नाही. आरोपी कोणत्या वाहनाने आले त्याबाबत मी तपास केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या कथनाप्रमाणे घटना घडल्याचे माझ्या तपासात निष्पन्न झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी गाडीवरुन पडल्याचा गैरफायदा घेवुन आरोपींना अटकविण्यासाठी त्याने उशिराने फिर्याद दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीचा डावा हात मोडला होता व तो ६ दिवस रुग्णालयात दाखल होता हे माझ्या तपासात निष्पन्न झाले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, वस्तुचिन्ह अ कडील काठी सारखी काठी गावात सहजपणे कोठेही उपलब्ध होते. हे म्हणणे खरे नाही की, वैद्यकीय प्रमाणपत्र हे फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे डॉक्टरांकडुन खोटे तयार करुन दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी गुन्हया केल्याचे शाबीत होत नसतांना मी त्यांच्या विरुद्ध खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या सांगण्यावरुन वाढीव कलम लावलेले आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHANUPRATAP BASANTSINGH CHOUHAN
Date: 2026.07.21 17:28:04 +0530

दि. २१/०७/२०२६. भानुप्रताप ब. चौहान
नंदुरबार. प्र. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नंदुरबार.